## आरोग्य विभाग ,जिल्हा परिषद बीड,
## गट-क संवर्गातील पदभरती जाहीर प्रकटन शुध्दीपत्रक

माहे मार्च २०१९ मध्ये जाहिरातीनुसार जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील आरोग्य विभागाशी संबंधित गट-क ची पदे भरणेबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८/ दि.०१/९/२०२१ अन्वये शुध्दीपत्रक प्राप्त झालेले आहे. सदरचे शासन शुध्दीपत्रक चे जिल्हा परिषद बीड च्या https://zpbeed.gov.in व www.beed.nic.in या संकेस्थळावर प्रसिध्द केलेले आहे. सदर शासन शुध्दीपत्रकातील सुचनांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच सदर भरतीबाबत यापुढील सर्व सुचना जिल्हा परिषदेच्या वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद बीड

सदस्य
जिल्हा निवड समिती
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बीड

Scanned by CamScanner

**माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील आरोग्य विभागाशी <u>संबंधीत गट-क संवर्गातील सर्व पदे भरण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८,**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक: ०१ सप्टेंबर, २०२१.

**<u>वाचा</u>:-**

१) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८, दि. १४/०६/२०२१.
२) ग्रामविकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.९९/आस्था- ८, दि. २०/०८/२०२१.

**<u>शासन शुध्दीपत्रक</u> :-**

**उपरोक्त वाचा क्र.१ येथील शासन निर्णय दि.१४/०६/२०२१ मधील परिच्छेद क्र. १ (६) मध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे :-**

"आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक (पुरुष) व आरोग्य सेविका या ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार असल्याने आता उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये परिक्षेकरिता उपस्थित राहता येईल. तसेच, उमेदवाराने एका जिल्हा परिषदेमध्ये एका पेक्षा जास्त पदांसाठी यापूर्वी अर्ज सादर केले असतील तर, संबंधित उमेदवारास संबंधित जिल्हा परिषदेमधून एकापेक्षा जास्त पदांसाठी परीक्षा देता येईल. या अनुषंगाने परिक्षेस पात्र उमेदवाराने यापुर्वी त्याने सादर केलेल्या अर्जानुसार कोणत्या जिल्हा परिषदेमधून परिक्षेस बसणार आहे याबाबतचा विकल्प देणे बंधनकारक असेल."

**तसेच,**

**उपरोक्त वाचा क्र.२ येथे नमूद शासन शुध्दीपत्रक २०/०८/२०२१ सोबतच्या विवरणपत्र "अ" मधील मुद्दा क्र. ५ खालील प्रमाणे आहे -**

"माहे मार्च, २०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेद्वारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत , अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरिलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल."

**याऐवजी**

**"माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही**

Scanned by CamScanner

OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षा देता येणार आहे. तथापि ५ संवर्गांच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गांच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील. अशा उमेदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहून परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिताच्या तयार होणाऱ्या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नांव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भूत केले जाईल.

तसेच, नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिणाऱ्या उमेदवाराला विभागाच्या दि.२३/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहिल. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित रहाण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत, **www.maharddzp.com** या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहिल," असे वाचावे.

३. शासन शुध्दीपत्रक दि.२०/०८/२०२१ सोबतच्या विवरणपत्र "अ" मधील मुद्दा क्र. ८ रद्द करण्यात येत आहे व विवरणपत्र "ब" मधील अ.क्र.२ मधून "एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्हयाचा विकल्प घेणे" ही बाब वगळण्यात येत आहे.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०९०११८२११५४०२० असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. वसंत माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव,

२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव,

३) मा.मंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव,



Scanned by CamScanner